# प्रकरण तिसरे

## अध्यापक विद्यालयाचे महत्त्व.

# प्रकरण तिसरे

## अध्यापक विद्यालयाचे महत्त्व.

३.०१ प्रस्तावना.

३.०२ सेवापूर्ण प्रशिक्षण

अ. क्षमता.

१. संदर्भ

२. संबोध.

३. आशय.

४. शैक्षणिक व्यवहार.

५. शैक्षणिक उपक्रम

६. शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर.

७. मूल्यमापन.

८. व्यवस्थापन.

९. पालक संपर्क.

१०. समाज संपर्क.

ब. बांधिलकी.

१. विद्यार्थ्यांशी.

२. समाजाशी.

३. व्यवसायाशी.

४. उत्तम यशप्राप्तीशी.

५. नैतिक मूल्यांशी.

क. कृतिकार्य.

१. वर्ग.

२. शाळापातळी.

३. शालाबाह्य.

४. पालक संपर्क.

५. समाज संपर्क.

३.३ सेवांतर्गत प्रशिक्षण.

अ. N.P.E.

ब. जिल्हा शिक्षक प्रशिक्षण संस्था.

क. N.C.T.E.

३.४ समारोप.

# प्रकरण तिसरे.

## अध्यापक विद्यालयाचे महत्त्व.

३.0१ प्रस्तावना.

प्राथमिक शिक्षकांना शिक्षण देण्यामध्ये अध्यापक विद्यालयांनी दोन तऱ्हेने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे, ती म्हणजे :-

१. सेवापूर्व प्रशिक्षण.

२. सेवांतर्गत प्रशिक्षण.

३.0२ सेवापूर्व प्रशिक्षण.

सेवापूर्व प्रशिक्षणामध्ये कशा प्रकारे अध्यापक विद्यालयांनी भूमिका बजावलेली आहे. ती पुढील विवेचनावरून लक्षात येईल. शालेय शिक्षणाच्या गुणवत्तावाढीसाठी क्षमताधिष्ठित व निष्ठासन्मुख शिक्षक तयार करणे हे अध्यापक विद्यालयाचे प्रमुख काम आहे. त्या दृष्टीने शिक्षकामध्ये कोणत्या क्षमता असावयास पाहिजेत त्या पुढील प्रमाणे दिलेल्या आहेत. "महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन जीवन शिक्षण" या पुस्तकात क्षमतांसंबंधी माहिती खालील प्रमाणे दिली आहे.

अ. क्षमता.

सेवापूर्व शिक्षक प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांनि पुढे दिलेल्या संदर्भ क्षमताच्या यादीतील विषयावर प्रभुत्व संपादन केले पाहिजे.

१. संदर्भ क्षमता.

१. संपूर्ण शिक्षण प्रक्रियेत शिक्षकाची भूमिका अभेद्य आणि महत्त्वाची आहे हे समजून घेणे.

२. शैक्षणिक दर्जा राखण्यासाठी राष्ट्रीय व राज्यपातळीवरील शैक्षणिक धोरणाशी परिचित राहून विकास करणे.

३. शैक्षणिक समस्यांना जबाबदार असणारे अनुपस्थिती, पटसंख्या, गळती, अपव्यय आणि प्रगतीला खीळ बसणे, अनुत्तीर्णांचे प्राथमिक स्तरावरील प्रमाण या बाबींचे ज्ञान करून घेणे इत्यादींचा संदर्भ क्षमतामध्ये समावेश होतो.

२. संबोध क्षमता.

सेवांतर्गत पूर्व शिक्षक प्रशिक्षण घेतल्यावर विद्यार्थी शिक्षक पुढील संबोध क्षमताच्या विषयावर प्रभुत्व मिळतील

१. अभ्यासपूरक आणि सामाजिक बांधिलकीच्या संदर्भात मुलांच्या वाढत्या गरजा समजून घेऊन त्याचे वर्गीकरण करणे.

२. उत्तम आणि परिणामकारक अध्ययन अनुभव देण्याकरिता अध्ययन प्रक्रियेचा, वर्गाचा, समाज जीवनाशी मेळ घालण्याचे ज्ञान घेणे.

३. अध्ययनात यश संपादण्यामध्ये आशावादी होण्यास मुलाच्या विशेष गरजा आणि अध्ययन अध्यापनातील युक्त्या निश्चित करणे.

३. आशय ज्ञान क्षमता.

सेवापूर्व शिक्षक प्रशिक्षण घेतल्यावर विद्यार्थी शिक्षकास खालील आशयज्ञान क्षमतावर प्रभुत्व मिळविता येते.

१. विद्यार्थ्यामधील आशय संपन्नतेच्या गरजा निश्चित करून त्यावर विशेष लक्ष केंद्रीत करणे.

२. वर्गात व वर्गाबाहेर आशयाचे अध्ययन आनंददायी करणाऱ्या बाबी निश्चित करून त्यांचा परस्पर संबंध लावणे.

३. विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील अडचणींचे विश्लेषण करणे आणि उपचारात्मक अध्ययन कौशल्ये विकसीत करून प्रत्येक विद्यार्थ्याची वैयक्तिक गरज भागविणे.

४. शैक्षणिक व्यवहार क्षमता.

सेवापूर्व शिक्षक प्रशिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थी शिक्षक खालील शैक्षणिक व्यवहार क्षमता संपादन करतील.

१. वर्गातील शैक्षणिक व्यवहार दर्जेदार व्हावेत म्हणून निरनिराळया शिक्षण पद्धती आणि तंत्राची गुणवत्ता समजून घेणे.

२. विद्यार्थ्यांच्या पातळीनुसार विविध पाठ टाचणे तयार करून वर्गातील संपर्क परिणामकारक करणे.

३. विद्यार्थ्यांच्या गरजांच्या अनुषंगाने महत्त्वाचा शैक्षणिक व्यवहार साधण्यासाठी प्रत्येक विषयाच्या अध्ययनाची किमान पातळी गाठण्याची संकल्पना समजून घेणे.

५. **अभ्यासेतर शैक्षणिक उपक्रम क्षमता.**

सेवापूर्व प्रशिक्षण घेतल्यानंतर प्रशिक्षणार्थी शिक्षक अभ्यासेतर शैक्षणिक उपक्रमांतर्गत पुढील क्षमता संपादन करेल.

१. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी अभ्यासेतर शैक्षणिक कृतिकार्याचे महत्व जाणून घेणे, कौशल्ये, प्रवृत्ती आणि नितिमूल्ये या संदर्भात विशेष लक्ष देणे.

२. शाळेचा वर्धापनदिन, प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, महापुरूषांचे जयंती व पुण्यतिथी या सारख्या शाळेत होणाऱ्या विविध कार्यक्रमात प्रभावीपणे भाग घेणे, मार्गदर्शन करणे.

३. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्या अंगातील कलागुण निश्चित करणे. तसेच त्यांचे संगोपन करण्यासाठी परिपाठ, परिसंवाद, सहली, चर्चासत्र इ.प्रकारचे विविध उपक्रम आयोजित करण्यास मदत करणे, सहभाग देणे.

६. **शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर क्षमता.**

सेवापूर्व प्रशिक्षणानंतर प्रशिक्षणार्थी शिक्षक शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर क्षमतेतील खालील क्षमतांवर प्रभुत्व संपादन करील.

१. शिक्षण परिणामकारक व सुलभ होण्यासाठी पाठयपुस्तक व इतर शैक्षणिक साहित्याचे महत्त्व समजून घेणे.

२. मुलांचा विषयानुरूप शब्दकोष, विश्वकोष इत्यादी विशेष साहित्य निश्चित करून अधिक अध्ययन साहित्य विकसीत करण्यास, शैक्षणिक साधने अद्ययावत करण्यास आणि अध्ययनात नवीन पद्धती आणण्यास त्याचा वापर करणे.

३. मुलांची विशिष्ट गरज जाणून कृतीकार्यास प्रोत्साहन देणारे अध्ययन साहित्य निश्चित करून निवडणे व तयार करणे.

७. मूल्यमापन क्षमता.

सेवापूर्व प्रशिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थी शिक्षक पुढील मूल्यमापन क्षमतावर प्रभुत्व मिळवील.

१. गुणदान पद्धतीचे मूल्यमापन विद्यार्थ्यांच्या केवळ पुस्तकी ज्ञानाच्या संपादन पातळीची नोंद होते हे समजून घेणे.

२. विद्यार्थी विकासाचे सातत्याने व व्यापक अर्थाने मूल्यमापन करण्याची निरनिराळी तंत्रे व पद्धती जाणून घेऊन त्यांचा वापर करणे.

३. विद्यार्थ्यांच्या आशय ज्ञानातील व इतर बाबतीतील दुर्बलता हेरणे व त्या कमतरता भरून काढण्यासाठी उपचारात्मक शैक्षणिक साहित्य तयार करणे.

८. व्यवस्थापन कौशल्ये.

सेवापूर्व प्रशिक्षण घेतल्यावर शिक्षक विद्यार्थी पुढील व्यवस्थापन क्षमतावर प्रभुत्व मिळवील.

१. व्यवस्थापन क्षमता हा शिक्षकांचा अत्यंत महत्त्वाचा गुण आहे हे समजून घेणे.

२. वर्गातील अध्यापनास आवश्यक असलेली व्यवस्थापन कौशल्ये व तंत्रे आत्मसात करणे, वैयक्तिक व संस्था पातळीवर शालेय व्यवस्थापन, संस्थेची इमारत व वातावरण आणि मानवी संबंधाबाबतचे व्यवस्थापन समर्थपणे करणे.

३. विविध वयोगटातील किंवा स्तरातील वर्ग एकाच खोलीत चालविणे अगर तुडुंब भरलेला एकाच वयोगटाचा वर्ग चालविण्याच्या तंत्रावर प्रभुत्व मिळविणे.

९. पालक संपर्क क्षमता.

सेवापूर्व प्रशिक्षण घेतल्यानंतर प्रशिक्षणार्थी पालक संपर्क क्षमतेच्या खालील क्षेत्रात प्रभुत्व संपादन करेल.

१. मुलांचे अध्ययन व विकासात पालकाची भूमिका काय आहे ते समजून घेणे.

२. मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी पालकाशी त्याच्या समस्यांवर चर्चा करणे.

३. पालकांच्या सक्रिय सहकार्याने पूर्ण आत्मविश्वासाने विशिष्ट मुलांच्या विशिष्ट गरजा भागविण्याचे ज्ञान देणे.

१०. समाज संपर्क क्षमता.

सेवापूर्व प्रशिक्षणानंतर शिक्षक प्रशिक्षणार्थी समाज संपर्काच्या खालील क्षमतावर प्रभुत्व मिळविल.

१. शालेय शिक्षण सुधार कार्यक्रमात समाज व इतर संस्थेचे महत्त्व जाणून घेणे.

२. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची शैक्षणिक उद्दिष्टे जाणून घेऊन समाजाच्या जास्तीत जास्त कार्यात सहभाग घेणे.

३. शाळा आणि समाज याच्यामध्ये हितकारक, फायदेशीर परस्पर संबंध विकसीत करणे.

वरील दहा क्षमता प्रशिक्षणार्थींनी संपादन केल्यामुळे उत्तम दर्जाचा शिक्षक बनु शकेल व त्याचा उपयोग करून विद्यार्थी हा सर्वगुणसंपन्न बनतो. दहा क्षमतांशिवाय शिक्षकांची बांधिलकी पुढील प्रमाणे आहे.

ब. बांधिलकी.

१. विद्यार्थ्यांशी बांधिलकी.

प्रशिक्षण वर्ग झाल्यावर सतत सरावाने विविध व्याख्याने कार्यक्रम व कृतीकार्यक्रमातील सक्रिय सहभागाने प्रशिक्षणार्थी शिक्षक पुढील निष्ठाविषयी होकारात्मक भूमिका विकसीत करील.

१. विद्यार्थ्यांच्या अध्ययनाच्या गरजा भागविण्यासाठी त्यांना हळुवारपणे संवेदनशीलतेने हाताळणे.

२. त्यांचे शरीर, मन आणि आत्मा यांच्या सर्वांगिण विकासासाठी त्यांच्या वृत्ती, सहज प्रवृत्ती, भावना, महत्वाकांक्षा आणि कलागुण समजून घेणे.

३. अध्ययन प्रक्रियेत प्रत्येक मुलाकडे वैयक्तिक लक्ष पुरविण्याचे ज्ञान घेणे.

---

१. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन, 'जीवन शिक्षण (मासिक), पुणे १९९५, पान नं १५ ते २०

२. समाजाशी बांधिलकी.

प्रशिक्षण चालू असताना सातत्याने केलेल्या सरावाद्वारे आणि विविध कृतिकार्य कार्यक्रम, सुसंवादातील सहभागाने शिक्षक प्रशिक्षणार्थी पुढील होकारात्मक भूमिका विकसित करेल.

१. वैयक्तिक व सांघिकरीत्या स्थानिक समाजासाठी जबाबदार असल्याची आणि जाब देण्याची वृत्ती इत्यादींचे ज्ञान घेणे.

२. शाळा आणि समाज यांच्यामध्ये भक्कम दुवा बनून परस्पर संबंध जोडणे.

३. समाजाच्या नाना त-हेच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यास योग्य ती मदत देणे.

३. व्यवसायाची बांधिलकी.

प्रशिक्षणाअंती सातत्याच्या सरावाने, कृतीकार्याद्वारे व कार्यक्रमामधून विद्यार्थी शिक्षक खालील होकारात्मक भूमिका विकसीत करतील.

१. शिक्षकी पेशा एक थोर व्यवसाय आहे असे त्याला वाटू लागणे त्यामुळे या व्यवसायाविषयी अभिमान बाळगून व्यावसायिक विकासाची प्रबळ इच्छा अंतर्यामी बाळगणे.

२. विशेषत: देशातील स्वदेशीकरणाच्या शिक्षण पद्धतीने ज्ञान देण्याची शिक्षण व्यवसायाला दिर्घ परंपरा असल्याचे जाणून घेणे.

३. शिक्षकाची भूमिका आणि शिक्षकी पेशाची प्रतिष्ठा ढासळविणा-या बाबी निश्चित करून त्याचे विश्लेषण करणे.

४. उत्तम यश प्राप्तीशी बांधिलकी.

सातत्याच्या सरावाने विविध कृतिकार्यात, कार्यक्रमात आणि उपक्रमात सक्रिय सहभाग घेतल्याने प्रशिक्षणार्थ्यांनि खालील सकारात्मक निष्ठा प्रशिक्षण संपल्यानंतर विकसीत केलेल्या असतील.

१. वैज्ञानिक दृष्टी आणि ज्ञानग्रहण करणे कारण शिक्षण व्यवसायातील प्रभुत्व पातळी गाठणे हे एक उद्दिष्ट आहे.

२. केवळ पुस्तकी ज्ञानाचे नव्हे तर कृती वर्तन आचार आणि चारि«य याद्वारा आदर्श शिक्षक होऊन प्रभुत्व पातळी गाठणे व उच्च दर्जा संपादणे.

३. व्यवसायात प्रभुत्व पातळी संपादन करण्यासाठी रोज वर्गात, वर्गाबाहेर व शालेय कामात पर्यायी पद्धत विकसीत करणे.

५. नैतिक मूल्यांशी बांधिलकी.

सातत्याने सराव करून विविध कृति कार्यात, कार्यक्रमात सहभाग, प्रशिक्षणार्थी शिक्षक पुढील सकारात्मक निष्ठा विकसीत करील.

१. संपूर्ण मानव जातीच्या सर्वांगिण विकासासाठी शिक्षकी पेशातील मूलभूत नितितत्वाचे ज्ञान करून घेणे.

२. भारताच्या घटनेत दिलेल्या मूलभूत हक्कानुसार आपल्यावर लादलेली आपली कर्तव्ये पार पाडण्याच्या संदर्भातील नितिमूल्यांची जपणूक करण्याकडे विशेष लक्ष देणे.

३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांनी बजावयाची भूमिका या अंतर्गत असणारी होकारात्मक नितिमूल्ये विकसित करणे.

वरील पाच बांधिलकी शिवाय शिक्षकाची कृतीकार्य महत्त्वाची आहेत. घेतलेल्या ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांच्या विकासासाठी करणे आवश्यक असते. तरच त्या ज्ञानाचा सदुपयोग होतो. त्यासाठी कृती करणे आवश्यक असते. ती कृति कार्ये पुढील प्रमाणे आहेत.

क. कृतिकार्य.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिक्षण संक्रमण या पुस्तकात कृतिकार्य संबंधीची माहिती खालील प्रमाणे दिली आहे.

घेतलेल्या ज्ञानाचा उपयोग प्रत्यक्षात कृतित आणणे आवश्यक असते. त्यासाठी कृतिकार्य करणे गरजेचे असते. ती कृतिकार्ये खालील प्रमाणे आहेत.

१. वर्गातील कृतिकार्ये.

सेवापूर्व प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थी शिक्षकास पुढील बाबी करण्यासाठी सातत्याने सराव व संधी उपलब्ध करून देण्यात येईल.

१. वर्गातील अनेक शैक्षणिक व्यवहार समर्थपणे पार पाडणे.

२. वर्गातील विविध स्तरातील मुलांच्या गरजानुसार विषयवार पाठाची तयारी करणे व पाठ घेणे.

३. अध्यापनाचे सादरीकरण परिणामकारक व्हावे म्हणून अध्यापनाच्या विविध पद्धती शिक्षक प्रशिक्षण केंद्रात शिकल्यानुसार शिकवणे.

२. **शाळापातळीवरील कृतिकार्ये.**

सेवापूर्व प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांना खालील गोष्टी करता याव्यात म्हणून विविध संधी उपलब्ध करून देण्यात येतील.

१. शालेय कृतिकार्याचे सादरीकरण करण्याचे महत्व समजून देणे. वर्गातील शैक्षणिक व्यवहार सांभाळून प्रत्येक विद्यार्थ्याचा वैयक्तिक विकास साधणे.

२. बैठे खेळ, क्रीडा, शैक्षणिक खेळ, स्पर्धा, मैदानी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, रांगोळी स्पर्धा अशा प्रकारच्या विविध शालेय कृतिकार्यात भाग घ्यावा म्हणून विद्यार्थ्यांच्या ठायी आवड निर्माण करणे व त्या द्वारा त्यांचे वैयक्तिक कलागुण जोपासून उत्तम सादरीकरण करणे.

३. एकीकडून जबाबदाऱ्या वाटून घेऊन शिक्षक व विद्यार्थ्यांना सहकार्याने काम करण्याची भावना विकसीत करणे तर दुसरीकडे विद्यार्थ्यांनी आपापसात उत्तम सहभाग घेऊन शालेय सण, राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय कार्यक्रम शाळेचे वार्षिक कार्यक्रम यांचे सादरीकरण करणे.

३. **शालाबाह्य कृतिकार्य.**

सेवापूर्व प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थी शिक्षकांना सातत्याने पुढील बाबी करण्याची संधी दिली जाईल.

१. सहली व महत्वाच्या शिक्षणोपयोगी स्थळांना क्षेत्रभेटी, अशा कार्यक्रमाना सार्थ महत्त्व देणे व त्यातून मुलांमध्ये सृजनशीलता विकसीत करून आपल्या सादरीकरणात सुधारणा करणे.

२. शालाबाह्य कृतिकार्याचे आयोजन करण्यात सक्रिय सहभागी होणे आणि त्यातील शैक्षणिक घटकाचे विश्लेषण करून शालेय सादरीकरण सुस्पष्ट करणे.

३. शिबिरे, कृतिसत्रे, चर्चासभा इत्यादी मध्ये स्वेच्छेने भाग घेणे व शालाबाह्य कृतिकार्याचे अधिक प्रभावीपणे सादरीकरण करणे.

## ४. पालक संपर्क कृतिकार्य.

सेवापूर्व प्रशिक्षण कालावधीत शिक्षक प्रशिक्षणार्थ्याला पुढील गोष्टी करण्यासाठी सातत्याने संधी व सराव देण्यात येईल.

१. संपूर्ण सत्रात पालकांचे सातत्याने सहकार्य अत्यावश्यक असून त्याद्वारा पाठयांचे अध्ययनात उत्तम सादरीकरण होण्यास शिक्षकाने त्यांची मदत घेण्याविषयी समजून घेणे.

२. पालक-शिक्षक संघटनेचे तसेच आई-शिक्षक संघटना यांचे शाळेच्या प्रभावी सादरीकरणात महत्त्व असल्याचे जाणून घेणे.

३. विविध विषयात मुलांच्या सादरीकरणात सुधारणा व्हावी म्हणून त्यांच्या वैयक्तिक समस्या जाणून घेण्यासाठी पालकांशी सक्रिय परस्पर संबंध साधणे.

## ५. समाज संपर्क कृतिकार्ये.

सेवापूर्व प्रशिक्षण कालावधीत शिक्षक प्रशिक्षणार्थ्याला पुढील गोष्टी करण्यास सातत्याने संधी देऊन सराव दिला जाईल.

१. खरोखरीच फायदेशीर सादरीकरण होण्यासाठी शाळा व समाजाने परस्पर संबंध प्रस्थापित करण्याची गरज समजून घेणे.

२. जबाबदार, अध्ययनशील समाज उभा करण्यास, घडविण्यास शाळेची जबाबदारी जाणून घेणे.

३. गरजेच्या वेळी आणि आपत्तीसमयी शाळेने समाजाशी संबंध साधणे व समस्या सोडविण्यासाठी आणि समाज कल्याणार्थ कार्य करणे.

वरील पाच कृतिकार्य शिक्षकाची आहेत. क्षमता, बांधिलकी, कृतिकार्य याबाबत योग्य ती जाणीव शिक्षकांमध्ये यावी यासाठी अध्यापक विद्यालयांनी आजपर्यंत महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. क्षमता, बांधिलकी व कृतिकार्यातून शिक्षकांची बौद्धिक व व्यावसायिक दृष्टया तयारी करून घेण्यामध्ये अध्यापक विद्यालय मागे राहिलेली नाहीत या कामामध्ये

अध्यापक विद्यालये महत्त्वाची कार्ये करीत आहेत. ही विद्यालये नवीन व सुसंस्कृत पिढी तयार करण्याचे कार्य करतात.

३.३ सेवांतर्गत प्रशिक्षण.

सेवांतर्गत शिक्षणाचे आयोजन ही कांही विशिष्ट अध्यापक विद्यालयात केली जातात. जसजसे नवीन गरजा पुढे येतील तसतसे शिक्षकी पेशातील शिक्षकांसाठी शिबीरे, कृतिसत्रे आणि दिशाबद्ध आखीव कार्यक्रमाचे वेळोवेळी अध्यापक विद्यालयामध्ये आयोजन केले जाते. त्याच बरोबर शाळा प्रमुखांना व इतर अध्यापकांना व्यवसायिक दिशा देण्याचे कामही अध्यापक विद्यालयातूनच केले जाते.

भारताची शिक्षण व्यवस्था फार मोठी आहे. भारतात सुमारे ५.९८ लाख आरंभिक शाळा (पूर्व प्राथमिक शाळा), १.९८ लाख प्राथमिक शाळा आणि ९८.00 माध्यमिक उच्च माध्यमिक शाळा आहेत. सुमारे १३00 प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण संस्था आणि सुमारे ७00 शिक्षण विद्यापीठ विभाग माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक तयार करीत आहेत. देशातील ४.५२ दशलक्ष शिक्षकांपैकी सुमारे ३ दशलक्ष शिक्षक पूर्व प्राथमिक व प्राथमिक स्तरावर अध्यापन करीत आहेत.

१९९२ च्या कृतिकार्यक्रमाने शिक्षक प्रशिक्षणाचा सेवापूर्व व सेवांतर्गत भाग एकत्र करून निरंतर प्रक्रिया म्हणून त्यावर भर दिलेला आहे.

अ. **N.P.E. (National Policy And Education) :-**

NPE १९८६ च्या शैक्षणिक आयोगानुसार केंद्र शासनाने शिक्षक प्रशिक्षण संस्थांची व्यावसायिक क्षमता मोठया प्रमाणावर वाढविण्यासाठी मोठे पाऊल उचलेले आहे. १९९७-९८ मध्ये सुमारे ४३0 जिल्हा शिक्षक प्रशिक्षण संस्थांची (DIET) ची स्थापना केली.

ब. जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था :-

१९९७-९८ साली जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आल्या. जिल्हा पातळीवर DIET कडे सेवांतर्गत व सेवापूर्व महत्त्वाचे स्रोत बनण्याची जबाबदारी आहे.

---

२. नेमचंद शितोळे (संपादक), <u>शिक्षण संक्रमण,</u> महाराष्ट्र राज्य मा.व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे १९९७, पान २२ ते ३0

क. **N.C.T.E. (National Council for Teacher Education ):-**

१९७३ पासून देशातील शिक्षक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी NCERT मध्ये NCTE कार्य करीत होती. १९९३ पासून संसदेने कायदा करून NCTE ला संविधानिक दर्जा दिलेला आहे. तेव्हापासून NCTE (National council for teacher education) ही शिक्षक शिक्षणाचा दर्जा पुरेसा वाढविण्यासाठी व इतर शैक्षणिक समस्याविषयी केंद्रीय व राज्य स्तरीय शासनांना सल्ला देण्याचे कार्य करते. NCTE ने सर्व पातळीवर शिक्षक शिक्षणाचा अभ्यासक्रम सुधारण्यासाठी एक आदर्श पाठयक्रमाची रूपरेषा प्रसिद्ध केली आहे. ह्या रूपरेषेच्या आधारे राज्य शासनाने आपल्या राज्यातील शिक्षक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात सुधारणा करावयाच्या आहेत. ह्या शिवाय ह्या परिषदेने शिक्षक शिक्षणाचे नवे अभ्यासक्रम विकसीत केले आहेत. NCTE ने शिक्षक शिक्षणाचा दर्जा टिकविण्यासाठी कांही प्रमाणके (Norms) घालून दिले आहेत.

NCTE च्या नॉर्मस्प्रमाणे प्राथमिक शिक्षकांना शिक्षण देण्यामध्ये अध्यापक विद्यालये अशाप्रकारे महत्त्वाची भूमिका बजावतात.

विधायक आणि नवनिर्माणक्षम पद्धतीने कार्य करण्यासाठी शिक्षकाला मदत, प्रोत्साहन व प्रेरणा देण्याचे काम अध्यापक विद्यालयांनी केलेले आहे.

शिक्षक प्रशिक्षण संस्था म्हणजे अध्यापन पद्धती विषयक कांही युक्त्या सांगणारी व त्याबाबतचे थोडेफार प्रात्यक्षिक काम करून घेणारी संस्था हे स्वरूप बदलून आता शिक्षणाच्या एकूण प्रक्रियेबाबत स्पष्ट ज्ञान देणारे शिक्षणशास्त्र महाविद्यालय झालेले आहे. शिक्षकाची ज्ञान क्षेत्रातील गुणवत्ता व अध्यापन पद्धतीबाबतची समर्थता या दोन्ही दृष्टीनी शिक्षक प्रशिक्षणाला महत्त्व प्राप्त झालेले आहे. ज्ञान व संस्कार या दृष्टीने कमालीची तफावत असलेले विद्यार्थी एकाच इयत्तेत असतात. अशा विद्यार्थ्यांना शिकविण्याचे अवघड व गुंतागुंतीचे काम आजच्या शिक्षकाला करावयाचे असल्याने शिक्षक प्रशिक्षणाला जास्त महत्त्व प्राप्त झालेले आहे व त्यापासून अपेक्षाही वाढल्या आहेत. शिक्षणाच्या विकासात शिक्षक प्रशिक्षण संस्था फार

14067
A

महत्वाचे कार्य करीत आहेत. अध्यापक विद्यालयाने वरील बाबींबरोबरच पुढे नमूद केलेल्या बाबींबाबतही महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.

१. शिक्षकास निकोप शैक्षणिक तत्वज्ञानाची बैठक प्राप्त करून दिलेली आहे.

२. शिक्षकास कार्यात्मक मानसशास्त्राचे ज्ञान प्राप्त करून दिलेले आहे.

३. शिक्षकास गतिमान समाजशास्त्राचे ज्ञान करून दिलेले आहे.

४. ज्ञानाच्या क्षेत्रातील नव्या संशोधनाशी शिक्षकाची ओळख करून दिलेली आहे.

५. आंतरराष्ट्रीय सामंजस्याबाबतचा योग्य दृष्टीकोन निर्माण केलेला आहे.

वरील पाच बाबींशिवाय शिक्षकाला जे अध्यापन करावे लागते त्या दृष्टीकोनातून पुढील बाबतीत मार्गदर्शन केलेले आहे.

१. शिक्षकाला विषयज्ञान व पद्धती या दोन्ही दृष्टीकोनातून परिपूर्ण ज्ञान देण्यात येत आहे.

२. विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र, अध्यापनशास्त्राची तत्वे व वर्ग हाताळण्याचे कौशल्य याबाबतही आवश्यक असणारे ज्ञान दिले जात आहे.

३. वर्गाची सर्वसाधारण बौद्धिक पातळी लक्षात घेऊन ज्ञानाचे प्रसारण करण्याची क्षमता निर्माण केलेली आहे.

४. अनेक प्रकारचे शैक्षणिक साहित्य वापरण्यासाठी व जरूर तेथे ते निर्माण करण्याची क्षमता प्राप्त करून दिलेली आहे.

५. द्यावयाच्या ज्ञानाचे नियोजन व संघटन करण्याची क्षमता प्राप्त करून दिलेली आहे.

६. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजा लक्षात घेऊन त्याप्रमाणे अध्यापन पद्धतीत योग्य ते बदल करता येण्याची पात्रता शिक्षकामध्ये निर्माण व्हावी या दृष्टीने प्रयत्न केलेले आहेत.

७. लोकशाही जीवनाबाबत श्रद्धा निर्माण करून तिचा शालेय विद्यार्थ्यात विकास करण्याच्या दृष्टीने विद्यार्थी शिक्षकात योग्य त्या वृत्ती निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

८. शालेय विद्यार्थ्यांच्या यशापयशाचे योग्य प्रकारे मूल्यमापन करण्याची क्षमता प्राप्त करून दिलेली आहे.

९. सहशालेय कार्यक्रमाचे नियोजन, पर्यवेक्षण आणि सहभाग या दृष्टीकोनातून आवश्यक असलेली कुवत निर्माण केलेली आहे.

१०. उद्योगप्रियता, नि:पक्षपातीपणा व मनाचा समतोल या गुणांचे संवर्धन प्रशिक्षण काळात झाले पाहिजे या दृष्टीनेही अध्यापक विद्यालयांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.

११. विद्यार्थी शिक्षकास स्वत:चे व विद्यार्थ्यांचे यथायोग्य ज्ञान मिळविण्याचे सामर्थ्य प्राप्त करून दिलेले आहे.

१२. विद्यार्थी शिक्षकात सामाजिक मूल्यांची व ध्येयाची जाणीव दृढ केलेली आहे.

१३. विद्यार्थी व एकूण सर्व युवक यांच्या उपयोगी पडता यावे म्हणून व्यावसायिक कर्तव्या बाबतची जाणीव शिक्षकामध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१४. शिक्षक व्यवसायात अनुस्यूत असलेली गतिमानता जाणण्याची व तिची यथार्थ कल्पना येण्याची पात्रता शिक्षकात यावी म्हणूनही अध्यापक विद्यालयांनी प्रयत्न केलेले आहेत.

१५. कार्यक्षम शिक्षक बनावे ही प्रेरणा विद्यार्थी शिक्षकात निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१६. अध्यापक विद्यालये शिक्षकांचे सल्लागार म्हणूनही काम करीत आहेत.

१७. विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची उर्मि निर्माण करणे, कसे शिकावे हे शिकविणे, शिकण्यास मदत करणे व शिकलेल्या भागाचे मूल्यमापन करणे ही आजच्या शिक्षकाची प्रमुख कामे बनतात आणि स्वाभाविकच ही कामे पार पाडण्यास शिक्षकास समर्थ बनविणे हे शिक्षक प्रशिक्षणाचे कामच आहे.

## ३.४ समारोप.

अशा रितीने प्राथमिक शिक्षकांना शिक्षण देण्यामध्ये अध्यापक विद्यालयांनी सेवापूर्व प्रशिक्षण व सेवांतर्गत प्रशिक्षण या दोन तऱ्हेने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.

या प्रकरणात अध्यापक विद्यालयाचे महत्त्व याचा अभ्यास केला. ही माहिती प्रस्तूत संशोधनासाठी पार्श्वभूमी म्हणून महत्त्वाची होती. यापुढील प्रकरणात या संशोधनासाठी

संशोधकाने कोणती संशोधन पद्धती वापरली, कोणती शैक्षणिक साधने वापरली व संशोधनासाठी आवश्यक ती माहिती कशाप्रकारे जमविली ते दिलेले आहे.